BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

महिला सक्षमीकरण आणि भारताचे आर्थिक स्थित्यंतर: एक दृष्टिक्षेप

डॉ. मेघा कनाटे

Email : meghasonare30@gmail.com

सारांश :

देशविकासामध्ये महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे राहिलेले आहे. मानवी जीवनाच्या प्रत्येक कालखंडामध्ये महिलांनी घर-कुटुंब, समाज आणि राष्ट्रनिर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण सहयोग दिलेला आहे. महिलांचे हे अतुलनीय कर्तृत्व लक्षात घेता त्यांच्या सन्मानार्थ 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः'[1] अशी उदात्त भूमिका भारतीय संस्कृतीने स्वीकारली असल्याचे दिसून येते. भारतीय समाजव्यवस्थेमधील महिलांचे स्थान अभ्यासताना प्रकर्षाने लक्षात येते की, भारतीय समाजव्यवस्थेमध्ये अपवादात्मक कालखंड वगळता महिला नेहमी सन्मानाकरिता पात्र राहिलेल्या आहेत. त्यामागे त्यांचा त्याग, पराक्रम आणि सामाजिक योगदान कारणीभूत होते. तथापि मध्यंतरीच्या काळामध्ये अनेक सामाजिक स्थित्यंतरे घडून आली. त्यामुळे घर-कुटुंब, समाज आणि राष्ट्रउभारणीमध्ये योगदान देणारी स्त्री पुरुषांच्या तुलनेत दुय्यम ठरविण्यात आली. अनेक प्रकारच्या मर्यादांमध्ये तिचे जीवन सीमित करण्यात आले. तसेच अनेक बंधने तिच्यावर लादण्यात आलीत. त्यामुळे 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः'[2] अशी उदात्त भूमिका स्वीकारणाऱ्या भारतीय समाजामध्ये महिलांबाबत "ढोल गँवार शूद्र पशु नारी। ये सब ताडन के अधिकारी।।"[3] याप्रकारचे मत नोंदविण्यात आल्याचे देखील दिसून येते. तात्पर्य असे की, भारतीय समाजव्यवस्था ज्या अनेक कालखंडांमधून मार्गक्रमण करीत गेली त्या सर्व कालखंडामध्ये घर-कुटुंब, समाज आणि राष्ट्रउभारणीमध्ये महिलांचे योगदान अतुलनीय राहिलेले आहे. महिला या जीवनाच्या बरोबरीच्या भागीदार आहेत. त्यामुळे त्यांना त्यांचा अधिकार आणि त्यानुसार प्राप्त होणारा सन्मान देणे हे सामाजिक, राष्ट्रीय आणि नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये महिला विकासाकरिता विशेष प्रयत्न करण्यात आले. याचा सकारात्मक परिणाम म्हणून आज महिला जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये उत्तुंग भरारी घेत आहेत. आपल्या कर्तृत्वाने त्यांनी महिला घर-कुटुंब, समाज आणि राष्ट्राला पुढे नेण्यामध्ये विकसित करण्यामध्ये योगदान देऊ शकतात, हे आपल्या कार्यकर्तृत्वाने सिद्ध केलेले आहे. त्यामुळे 'विकसित भारत - 2047 च्या स्वप्नपूर्तीमध्ये महिलांचे योगदान अतुलनीय राहणार असल्याचे मान्य करावे लागते. महत्त्वाचे म्हणजे आज भारतीय अर्थव्यवस्थेला कजी उर्जितावस्था प्राप्त झालेली आहे. त्यामागे महिला सक्षमीकरण धोरण प्रामुख्याने कारणीभूत आहे. 'महिला सक्षमीकरण आणि भारताचे आर्थिक स्थित्यंतर' या परस्परपूरक बाबी आहेत, त्यामुळे महिला सक्षमीकरण ज्या गतीने होत राहील त्याच वेगाने देशाचा आर्थिक विकास होणार आहे.

महत्त्वाचे शब्द (Keywords) : (1) महिला सक्षमीकरण, (2) आर्थिक स्थित्यंतर, (3) विकसित भारत, (4) श्रमशक्ती.

प्रस्तावना :

जगाच्या इतिहासामध्ये भारताची नोंद एक सशक्त आणि संपन्न राष्ट्र म्हणून आहे. भारत देशमानवी जीवनाशी संबंधित विविध क्षेत्रांमधील ज्ञानशक्तीच्या जोरावर जगाचे नेतृत्व करीत होता. तथापि काळाच्या ओघामध्ये देशाचे वैभव मागे पडले. तथापि या देशाचे हे हरविलेले वैभव त्याला पुन्हा प्राप्त करून देण्याकरिता राष्ट्रीय स्तरावरून 'विकसित भारत-2047' ही संकल्पना नव्याने देशासमोर ठेवण्यात आली असून या स्वप्नपूर्तीकरिता विशेष प्रयत्न करण्यात येत आहे. या अनेक प्रयत्नांमधील एक भाग म्हणजे महिलांचे सक्षमीकरण होय. महिला सक्षमीकरण आणि राष्ट्रविकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

त्यामुळे मागील काही काळापासून देशांतर्गत महिला सक्षमीकरणावर विशेष भर देण्यात आला. त्याचे सकारात्मक परिणाम म्हणून जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये महिलांची सहभागिता मोठ्या प्रमाणात वाढीस लागली आहे. महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण आणि शहरी या दोन्ही क्षेत्रांमधील महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत, स्वावलंबी होत आहेत. यामध्ये ग्रामीण महिलांची प्रगती कौतुकास्पद आहे. ग्रामीण भागामधील महिलांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेत 'श्रमिक महिला ते उद्योजक महिला' अशी नेत्रदीपक प्रगती केली आहे. यात लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे महिलांनी स्वतःच्या आर्थिक विकासासोबत देशाच्या आर्थिक विकासामध्ये महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. त्यामुळे आज देशाची विविध क्षेत्रांमध्ये होत असलेल्या प्रगतीमध्ये विशेषतः आर्थिक विकासामध्ये महिलांचे योगदान फार मोठे आहे. अर्थात यामागे भारत सरकारच्या महिला सक्षमीकरण धोरणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरलेली आहे. त्यामुळे महिला सक्षमीकरण म्हणजेच देशाचे सक्षमीकरण हे समीकरण कसोटीवर खरे उतरलेले आहे. याद्दृष्टीने देशामधील महिला सक्षमीकरणाचा आढावा घेणे आवश्यक ठरते. तसेच याकरिता कारणीभूत ठरलेल्या विविध शासकीय योजनांचा देखील आढावा महत्त्वाचा ठरतो. महत्त्वाचे म्हणजे महिलांची आर्थिक क्षेत्रामधील सक्षमता आणि स्वावलंबन आणि त्यांचा 'श्रमिक महिला ते उद्योजक महिला' येथवरचा प्रवास थक्क करणारा असल्यामुळे कुटुंबासोबत आता देशाच्या आर्थिक स्थित्यंतरामध्ये हातभार लावणाऱ्या महिलाशक्तीचे केवळ कौतुक न करता त्यांचा आदर्श समाज आणि देशासमोर ठेवणे आवश्यक झाले आहे. याद्दृष्टीने समाजाला विशेषतः या प्रवाहापासून अद्याप दूर असलेल्या महिलांना प्रेरणा मिळावी या उदात्त हेतुने 'महिला सक्षमीकरण आणि भारताचे आर्थिक स्थित्यंतर: एक दृष्टिक्षेप' हा विषय संशोधन कार्याकरिता घेण्यात आलेला आहे.

उद्दिष्टे :

प्रस्तुत शोध निबंधाकरिता पुढीलप्रमाणे उद्दिष्टांची निश्चिती करण्यात आलेली आहे.

1. महिला सक्षमीकरणाचा आढावा घेणे. तसेच देशाचा आर्थिक विकास व महिला सक्षमीकरण यामधील परस्पर संबंध अभ्यासणे.
2. शासनाच्या विविध योजनांचा महिला सक्षमीकरणावर झालेल्या परिणामांचा आढावा घेणे.
3. भारतीय महिलांच्या श्रमशक्ती सहभागामध्ये झालेला बदल अभ्यासणे.
4. महिलांमधील आर्थिक स्वावलंबनाचा त्यांच्या व्यक्तिगत जीवनावर तसेच कुटुंबावर झालेला परिणाम अभ्यासणे.
5. महिलांमधील आर्थिक विकासामध्ये येणाऱ्या अडचणी / आव्हानांचा अभ्यास करणे. तसेच त्यावर उपाययोजना सूचविणे.

संशोधन पद्धती :

'महिला सक्षमीकरण आणि भारताचे आर्थिक स्थित्यंतर: एक दृष्टिक्षेप' या विषयावर संशोधन लेखन करण्यामागे या दोन्ही संकल्पनांमधील परस्पर संबंध अभ्यासणे आणि त्याचे विश्लेषण करणे हा प्रमुख हेतू आहे. प्रस्तुत संशोधन गुणधर्मात्मक, विश्लेषणात्मक व वर्णनात्मक असल्यामुळे यामध्ये विषयांकीत प्रकरणी झालेल्या धोरणांचा, बदलांचा तसेच उपलब्ध सांख्यिकीय माहितीचा चिकित्सक अभ्यास करण्यात आलेला आहे. महत्त्वाचे म्हणजे प्रस्तुत संशोधन अभ्यास हा माहितीच्या दुय्यम स्त्रोतांवर आधारित आहे. याकरिता संबंधित शासकीय विभागांकडील माहिती उपयोगामध्ये आणण्यात आलेली आहे. तसेच सदर संशोधन अभ्यासाकरिता विषयाशी संबंधित विविध संदर्भ साहित्याचा आढावा आणि आधार घेण्यात आलेला आहे. तसेच प्राप्त माहितीचे तार्किक विश्लेषण करण्यात आलेले आहे. महिला सक्षमीकरणामध्ये विकसित भारत-2047 चे स्वप्न साकार करण्याची क्षमता आहे. याद्दृष्टीने महिला सक्षमीकरणाचे देशाच्या आर्थिक विकासामध्ये लक्षणीय योगदान ठरणार

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

आहे. महत्त्वाचे म्हणजे शासनाच्या विविध विभागांकडील महिला सक्षमीकरण आणि त्यामाध्यमातून देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये घडून आलेल्या तसेच भविष्यात घडून येणाऱ्या आर्थिक स्थित्यंतराबाबतची आकडेवारी अत्यंत बोलकी असून महिला सक्षमीकरण देशाच्या अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होत असल्याचे सिद्ध करीत आहेत. एकूणच देशामधील महिला सक्षमीकरणाची स्थिती विकसित भारत-2047 च्या स्वप्नपूर्तीला आकार देण्याच्या दृष्टीने व देशाला आर्थिक महासत्ता करण्याच्या दृष्टीने आश्वासक आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या स्थित्यंतरामध्ये महिलांची भूमिका महत्त्वाची राहिलेली आहे. हे पुढील सांख्यिकीय विश्लेषणावरून अधिक स्पष्ट होते.

1) भारतीय महिलांचा श्रमशक्तीमधील सहभाग:[4]

भारतीय महिलांचा श्रमशक्तीमधील सहभाग मागील काही काळामध्ये झपाट्याने वाढला आहे. त्यामुळे महिलांनी आपल्या श्रमशक्ती योगदानाद्वारे देशाच्या अर्थव्यवस्थेला नवी उभारी देण्याचे काम केले आहे. यादृष्टीने पुढील आकडेवारी महत्त्वाची ठरते.

वर्ष	ग्रामीण क्षेत्र	शहरी क्षेत्र	एकूण राष्ट्रीय सरासरी
2017-18	24.6%	20.4%	24.6%
2020-21	35.5%	23.2%	32.5%
2025	45.9%	27.7%	40%

उपरोक्त तक्त्यामधील आकडेवारीचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, सन 2017-18 मध्ये भारतीय महिलांचा श्रमशक्तीमधील सहभाग केवळ 24.6 टक्के इतका होता. तो सन 2025 मध्ये वाढून 40 टक्क्यांवर पोहोचलेला आहे. महत्त्वाचे म्हणजे शहरी भागांच्या तुलनेमध्ये ग्रामीण भागामधील महिलांचा शहरी भागांमधील महिलांच्या तुलनेमध्ये सहभागिता लक्षणीय वाढलेली आहे. तात्पर्य असे की, ग्रामीण भागामधील महिला आपल्या श्रमशक्तीच्या जोरावर देशाच्या अर्थचक्राला गती देण्यामध्ये शहरी भागांमधील महिलांच्या समोर आहेत.

2) शासकीय योजनांमधील महिलांचा सहभाग:

देशाच्या अर्थव्यवस्थेला गती देण्याचे सामर्थ्य महिलाशक्तीमध्ये असल्यामुळे देशांतर्गत महिला सक्षमीकरणाच्या कार्याला विशेष गती देण्यात आली. महिलांचा विकास व्हावा, त्यांचे सक्षमीकरण व्हावे तसेच महिला उदयोजक म्हणून पुढे याव्यात याकरिता शासनस्तरावरून विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. परिणामस्वरूप महिला सक्षमीकरणाला दिशा व गती प्राप्त झाली तसेच त्याचा सकारात्मक परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झाला. यादृष्टीने पुढील आकडेवारी लक्षणीय ठरते.

योजनेचे नाव	व्याप्ती	महिलांची सहभागिता

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

पंतप्रधान जन धन योजना (PMJDY)[5]	53 कोटीपेक्षा अधिक खातेदार	55 टक्के महिला खातेदार
प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY)[6]	48 कोटीपेक्षा अधिक कर्जवितरण	70 टक्के कर्जाचे महिला उदयोजकांना वितरण
महिला बचत गट[7]	93 लाख स्वयंसहायता बचत गट	10.3 कोटी महिलांची बचत गटांमध्ये प्रत्यक्ष सहभागिता
लखपती दीदी योजना[8]	3 कोटीपेक्षा अधिक महिलांची सहभागिता	2029 पर्यंत नवीन 6 कोटी महिला जोडण्याचे लक्ष्य

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, महिला सक्षमीकरण करण्याकरिता शासनस्तरावरून सुरू करण्यात आलेल्या योजनांचा सकारात्मक परिणाम होत आहे. या योजनांच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणाच्या प्रक्रियेस विशेष गती प्राप्त झाली आहे. त्याचा सकारात्मक परिणाम म्हणून देशाच्या आर्थिक विकासामध्ये महिलांची सहभागिता वाढली आहे. महत्त्वाचे म्हणजे शासनाच्या योजनांमुळे महिलांची 'श्रमिक महिला ते उद्योजक महिला' या प्रकारची विकासात्मक वाटचाल झालेली आहे. तात्पर्य असे की, देशाच्या आर्थिक स्थित्यंतरामध्ये महिला सक्षमीकरणाचे योगदान मोठे आहे; तथापि राष्ट्रीय स्तरावर विकसित भारत-2047 चे लक्ष्य निर्धारित करण्यात आलेले असल्यामुळे महिलांची देशाच्या आर्थिक विकासामध्ये सहभागिता आज आहे त्यापेक्षा वाढविणे हे लक्ष्य निर्धारित करण्यात आलेले आहे. त्याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे—

भारतीय महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाची सद्यस्थिती व अपेक्षित लक्ष्य

अ. क्र.	क्षेत्रविवरण	सद्यस्थिती	विकसित भारताचे ध्येय	स्रोत
1	महिला श्रमशक्ती सहभाग (LFPR)[9]	41.7%	50%	सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार यांचा नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण वार्षिक अहवाल 2023-2024
2	मुद्रा योजनेअंतर्गत कर्ज घेतल्याबाबत महिलांचे प्रमाण[10]	68%	100%	केंद्रीय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालय, भारत सरकार तसेच अर्थ मंत्रालय, भारत सरकार यांनी जाहीर केलेली प्रधानमंत्री मुद्रा योजनेची अधिकृत आकडेवारी

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

				(Central Data Team, PMMY, Ministry of Finance)
3	महिलांच्या मालकीचे एमएसएमई (MSME)[11]	20.5%	35.0%	एमएसएमई (MSME) मंत्रालय, भारत सरकार, उद्यम नोंदणी पोर्टल (Udyam Portal) वार्षिक सांख्यिकी अहवाल
4	महिलांचे बँक खाते[13]	77%	100%	आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षण अहवाल (NFHS-5)

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन केल्यानंतर लक्षात येते की, महिलाशक्तीचे महत्त्व शासनस्तरावरून सर्वमान्य झाल्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाकरिता आणि विकसित भारत-2047 च्या स्वप्नपूर्तीकरिता महिला सक्षमीकरण आणि महिलांच्या देशविकासामधील सहभागितेमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करण्याचे लक्ष्य शासनस्तरावरून निर्धारित करण्यात आलेले आहे. यावरून स्पष्ट होते की, देशाच्या आर्थिक स्थितीमध्ये लक्षणीय सुधारणा करण्याचे सामर्थ्य महिलांमध्ये आहे. आवश्यक आहे ती त्यांना संधी देण्याची, त्यांच्या सक्षमीकरणाकरिता आवश्यक संधी व वातावरण तयार करण्याची. याद्दष्टीने भारत सरकार विशेष प्रयत्न करीत आहे. ही महिला सक्षमीकरण आणि देशाच्या सर्वांगीण विकासाच्या द्दष्टीने अत्यंत सकारात्मक संकेत आहेत.

निष्कर्ष आणि चर्चा :

महिला सक्षमीकरण आणि भारताचे आर्थिक स्थित्यंतर: एक द्दष्टिक्षेप या संशोधन विषयाच्या अभ्यासाकरिता संबंधित विविध शासकीय विभागांद्वारे अधिकृतरित्या प्रकाशित करण्यात आलेल्या आकडेवारीचा अभ्यास केल्यानंतर तसेच विषयाच्या अनुषंगाने उपलब्ध इतर साहित्यांचे अवलोकन केल्यानंतर प्रकर्षाने लक्षात येते की, मागील काही वर्षांमध्ये महिला सक्षमीकरणाच्या स्थितीमध्ये लक्षणीय सकारात्मक बदल झालेले आहेत.

1. महिलांचा श्रमशक्तीमधील क्रियाशील सहभाग मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण भागामधील महिलांचा 'श्रमिक महिला ते उद्योजक महिला' असा सकारात्मक प्रवास मागील काही वर्षांमध्ये सुरू झाला आहे. महिला बचत गटांच्या माध्यमातून तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेत महिलांनी लहान-मोठ्या उद्योग क्षेत्रामध्ये यशस्वी प्रवेश केलेला आहे. पशुपालन, दुग्धव्यवसाय, अनेक प्रकारचे गृहउद्योग आज महिला चालवीत आहेत. महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये आलेला हा एक प्रभावी आणि आशादायक बदल आहे.

2. भारत सरकारच्या विविध योजनांचा महिलांना प्रत्यक्ष लाभ झालेला आहे. या योजनांच्या माध्यमातून महिलांद्वारे अनेक उद्योगांची यशस्वी उभारणी करण्यात आलेली असून त्या उद्योगांमध्ये अनेकांना रोजगार मिळाला आहे. महिला सक्षमीकरणाचे एक अद्भुत उदाहरण आहे. विशेष म्हणजे भारत सरकारच्या मुद्रा योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये महिला

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

लाभार्थ्यांची संख्या मोठी आहे. तात्पर्य असे की, महिलांनी त्यांना मिळालेल्या संधीच्या माध्यमातून स्वतःसह देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावलेला आहे.

3. शासनाच्या विविध योजनांमुळे महिला सक्षमीकरणाला दिशा व गती प्रदान झालेली आहे. त्याचा सकारात्मक परिणाम म्हणून महिलांच्या व्यक्तिगत, कौटुंबिक स्थितीमध्ये सकारात्मक बदल झाला आहे. आर्थिक सुस्थितीमुळे कुटुंबांच्या विकासाला दिशा व योग्य गती देण्यामध्ये महिला यशस्वी झालेल्या आहेत. त्याचा सकारात्मक परिणाम विकसित भारत-2047 च्या स्वप्नपूर्तीकरिता होणार आहे.

तात्पर्य असे की, महिला सक्षमीकरणाचा सकारात्मक परिणाम देशाच्या आर्थिक स्थित्यंतरावर होत असतो. तसा तो होत आहे. तथापि आज देखील देशामध्ये असंघटित क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या महिलांची संख्या मोठी आहे. या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करता येत नाही, येणार नाही. त्यामुळे विकसित भारत-2047 चे स्वप्न साकार करण्याकरिता तसेच महिला सक्षमीकरणाचा प्रवाह सर्व महिलांपर्यंत घेऊन जाणे आवश्यक आहे. याद्दृष्टीने 'देशाचे आर्थिक स्थित्यंतर आणि महिला सक्षमीकरण' या समोरील आव्हानांचा अभ्यास करणे आणि त्यामधून मार्ग काढीत विकसित भारत-2047 च्या स्वप्नपूर्तीकरिता पुढे वाटचाल करणे आवश्यक ठरते.

आव्हाने :

आज देशामध्ये महिला सक्षमीकरणाचे कार्य वेगाने होत आहे. शासन आणि समाज या दोन्ही स्तरावरून याकरिता विशेष प्रयत्न होत आहे. त्यामुळे महिला सक्षमीकरणाचा प्रत्यक्ष लाभ देशाच्या आर्थिक विकासावर होत आहे. तथापि महिला सक्षमीकरण आणि भारताचे आर्थिक स्थित्यंतर या समोर अनेक आव्हाने आहेत. त्यामुळे या आव्हानांचा विचार होणे आवश्यक ठरते. सामान्यतः देशामधील महिला सक्षमीकरण आणि आर्थिक स्थित्यंतरासमोर पुढील आव्हाने आहेत.

1. आज महिला सक्षमीकरण प्रक्रियेने देशामध्ये वेग धरला असला तरी देशांतर्गत लिंगभेदभाव पूर्णतः संपलेला नाही. त्यामुळे अनेक क्षेत्रांमध्ये पुरुषांच्या तुलनेमध्ये महिलांना मिळणारी संधी आणि रोजगार कमी आहे. यामधील विषम स्थिती दूर होणे आवश्यक आहे.
2. असंघटित कामाचे क्षेत्र व्यापक आहे. संघटन नसल्यामुळे असंघटित क्षेत्रामधील कामाच्या ठिकाणी विविध प्रकारच्या शोषणाची स्थिती चिंताजनक आहे. त्यामुळे असंघटित क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षा आणि सक्षमीकरणाकरिता कार्य होणे आवश्यक ठरते.
3. देशाचा भौगोलिक व्याप मोठा आहे. वेगवेगळ्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये झालेला असंतुलित विकास ही देशासमोरील मोठी समस्या आहे. देशामधील अनेक भागांमध्ये अद्याप पायाभूत सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. महत्त्वाचे म्हणजे आरोग्य, शिक्षण आणि दळणवळणाच्या साधनांचा अभावाची स्थिती देशामधील अनेक भागांमध्ये आज देखील मोठ्या प्रमाणात आहे. महिला सक्षमीकरणासमोरील हे एक आव्हान आहे. त्यामुळे दुर्गम आणि दुर्लक्षित क्षेत्रांचा विकास होणे आणि त्याठिकाणी किमान पायाभूत सुविधा आणि सुरक्षितता उपलब्ध होणे आवश्यक आहे.

समारोप :

देशाचा विकास हा तेथील मनुष्यबळाच्या सक्षमतेवर आणि सहभागितेवर अवलंबून असतो. त्यामुळे देशविकासामध्ये पुरुषांच्या बरोबरीने महिलांची सहभागिता असणे आवश्यक ठरते. ज्या देशामध्ये महिला आणि पुरुष बरोबरीने देशविकासामध्ये सहभाग नोंदवितात, तो देश जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये प्रगती करतो. त्यामुळे देशविकासाशी संबंधित सर्व क्षेत्रांमध्ये महिलांची सहभागिता वाढविण्याकरिता देशांतर्गत महिला सक्षमीकरणाचे धोरण अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

आले. त्याचे सकारात्मक परिणाम आता दिसून येत आहेत. महत्त्वाचे म्हणजे महिला सक्षमीकरणाकरिता आणि महिलांना आर्थिक सक्षम करून देशाच्या अर्थविकासामध्ये भागीदार करून घेण्याकरिता राबविण्यात आलेल्या विविध योजनांमुळे एकीकडे महिलांच्या सक्षमीकरणाची चक्रे वेगाने फिरली, तर दुसरीकडे देशाच्या आर्थिक स्थित्यंतरामध्ये महिलांची सहभागिता वाढीस लागली. यादृष्टीने महिला बचत गटांच्या माध्यमातून झालेले कार्य विशेष उल्लेखनीय ठरते. तसेच केंद्र शासनस्तरावरील प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजना, लखपती दीदी योजना या योजना महिलांना सक्षम करण्याकरिता विशेष यशस्वी ठरल्या आहेत. या योजनांच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण घडून आले. त्याचा सकारात्मक परिणाम म्हणून महिलांच्या सामाजिक सक्षमीकरणाचा मार्ग अधिक प्रशस्त झाला. कौटुंबिक आर्थिक सुबत्ता आल्यामुळे त्याचा सकारात्मक परिणाम महिलांच्या व्यक्तिगत व कौटुंबिक जीवनावर झाला. महिला सक्षमीकरणामुळे महिलांचा 'श्रमिक महिला ते उद्योजक महिला' हा आश्वासक प्रवास देशाला आर्थिक क्षेत्रांमध्ये ऊर्जा देणारा ठरला. त्यामुळे हे मान्य करावे लागते की, देशाच्या आर्थिक विकासामध्ये महिला सक्षमीकरणाचे योगदान मोठे असते. तात्पर्य असे की, महिला सक्षमीकरण आणि भारताचे आर्थिक स्थित्यंतर या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्या परस्परांना प्रभावित करतात. आज देशामधील महिला देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावत आहे. देशाने महिला सक्षमीकरणामध्ये दिलेल्या योगदानाची महिलांद्वारे होत असलेली ही परतफेड आहे, असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरणार नाही. त्यामुळे देशामधील महिलाशक्ती देशाच्या आर्थिक स्थित्यंतरामध्ये हातभार लावीत देशाला आर्थिक महासत्ता करण्यामध्ये सहाय्यभूत ठरणार असून विकसित भारत-2047 च्या स्वप्नपूर्तीमध्ये महिलांचे योगदान निःसंदेह मोठे असणार आहे.

संदर्भ सूची :

1. शास्त्री, ह. (२००१). *मनस्मृती* (गो. नेने, संपा.). चाखाम्भा संस्कृत संस्थान प्रकाशन.
2. शास्त्री, ह. (२००१). *मनस्मृती* (गो. नेने, संपा.). चाखाम्भा संस्कृत संस्थान प्रकाशन.
3. माणे, मा. (१९९७). *भारतीय समाज*. विदया प्रकाशन.
4. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय. (२०२६). *आवर्ती श्रमशक्ती सर्वेक्षण वार्षिक अहवाल* (२०२५). राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार.
5. केंद्रीय अर्थ मंत्रालय. (२०२६). *भारत सरकारचा आर्थिक सर्व्हेक्षण अहवाल व पंतप्रधान जन धन योजना आणि मुद्रा योजना प्रगती आकडेवारी*. भारत सरकार.
6. केंद्रीय अर्थ मंत्रालय. (२०२६). *भारत सरकारचा आर्थिक सर्व्हेक्षण अहवाल व पंतप्रधान जन धन योजना आणि मुद्रा योजना प्रगती आकडेवारी*. भारत सरकार.
7. केंद्रीय अर्थ मंत्रालय. (२०२६). *भारत सरकारचा आर्थिक सर्व्हेक्षण अहवाल व पंतप्रधान जन धन योजना आणि मुद्रा योजना प्रगती आकडेवारी*. भारत सरकार.
8. ग्रामीण विकास मंत्रालय. (२०२६). *लखपती दीदी उपक्रम प्रगती अहवाल*. भारत सरकार.
9. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय. (२०२४). *नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण वार्षिक अहवाल २०२३-२०२४*. भारत सरकार.
10. केंद्रीय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालय व अर्थ मंत्रालय. (२०२६). *प्रधानमंत्री मुद्रा योजनेची अधिकृत आकडेवारी*. भारत सरकार.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

11. एमएसएमई मंत्रालय. (२०२६). *उद्यम नोंदणी पोर्टल वार्षिक सांख्यिकी अहवाल*. भारत सरकार.

12. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय. (२०२६). *राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षण अहवाल (NFHS-5)*. भारत सरकार.

13. गव्हाणे, सु. (२०२२). *भारतीय अर्थव्यवस्थेचे स्थित्यंतर आणि आधुनिक आव्हाने*. डायमंड प्रकाशन.

14. पाटील, वि. (२०२३). *महिला उद्योजकता आणि आर्थिक विकास*. फडके प्रकाशन.

15. सांगळे, शै. (२००९). *भारतातील महिला उद्योजक*. डायमंड प्रकाशन.

16. गोडबोले, मं. (२०२३). *थेंबे-थेंबे-बचत गटाची यशकथा*. राजहंस प्रकाशन.